# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## “हिंदी दिवस”

### अहवाल

---

**दिनांक : २१ सप्टेंबर, २०२६**

**स्थळ : शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल**

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक २१ सप्टेंबर, २०२६ रोजी “हिंदी दिवस” कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. हिंदी भाषेचे महत्त्व, तिची समृद्ध परंपरा आणि दैनंदिन जीवनातील तिचा उपयोग यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी प्राध्यापिका मा.बिजली दडपे मॅडम यांचे स्वागत मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांचे स्वागत मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व प्राध्यापकांचे स्वागत छात्राध्यापकांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी सर्व छात्राध्यापक-छात्राध्यापिका उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्राध्यापिका प्रणिता कदम यांनी केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी प्रा. मा. बिजली दडपे मॅडम यांचा परिचय मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी प्राध्यापिका मा. बिजली दडपे मॅडम यांनी हिंदी भाषेचे महत्त्व, तिचा शैक्षणिक उपयोग आणि विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेचा योग्य वापर कसा करावा याविषयी मार्गदर्शन केले. साहित्य व त्याचा शैक्षणिक उपयोग याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी हिंदीतील प्रेरणादायी कविता सादर करून त्यांचा अर्थ स्पष्ट केला. तसेच हिंदीसोबतच सर्व भाषांचा समान आदर केला पाहिजे आणि विद्यार्थ्यांनी भाषेचा योग्य वापर करावा, असा प्रेरणादायी संदेश दिला.

यानंतर मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना हिंदी भाषेबद्दल अभिरुची निर्माण करण्याचा संदेश दिला. शेवटी छात्राध्यापिका शिवानी डोईफोडे यांनी आभार प्रदर्शन केले. सायली चिकणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्यंत प्रभावी, उत्स्फूर्त व सुरेख पद्धतीने

केले. सदर कार्यक्रम हा महाविद्यालयाच्या मा. प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वेळेमध्ये आणि शिस्तीत संपन्न झाला.



शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

(द्वितीय वर्ष बी. एड.२०२५-२७)

हिंदी दिवस

कार्यक्रम पत्रिका

दि. २१ सप्टेंबर २०२६

| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन | मा. प्राचार्य आणि प्राध्यापकवृंद |
| प्रमुख पाहुण्यांचे स्वागत | मा.प्रा.डॉ. रमा भोसले |
| मा. प्राचार्यांचे स्वागत | मा.. प्रा.डॉ.नीलिमा मोरे |
| प्राध्यापकांचे स्वागत | द्वितीय वर्ष छात्राध्यापक |
| प्रास्ताविक | प्राची गरड |
| सूत्रसंचालक | सायली चिकणे |
| प्रमुख पाहुण्यांचा परिचय | मा.प्रा.डॉ.नीलिमा मोरे |
| प्रमुख पाहुण्यांचे मनोगत | मा.प्रा .बिजली दडपे |
| अध्यक्षीय मनोगत | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| आभार प्रकटीकरण | शिवानी डोईफोडे |
| कार्यक्रम पत्रिका, निमंत्रण पत्रिका, रांगोळी | यश पाटील |
| फलक लेखन | नितीन कवाड |
| फोटोग्राफी व व्हिडीओ | प्राची गरड |

स्थळ - सरस्वती कक्ष वेळ - ११ : ४५ वाजता



# हिंदी दिवस कार्यक्रम : छायाचित्रे




१. सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करताना मा.प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम, कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी प्रा.मा.बिजली दडपे मॅडम आणि सर्व प्राध्यापक वृंद.




२. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी प्राध्यापिका मा. बिजली दडपे मॅडम यांचे मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांच्या हस्ते स्वागत करताना.




३. मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांचे मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांच्या हस्ते स्वागत करताना.




४. हिंदी दिवस कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना छात्राध्यापिका प्रणिता कदम.




५. माजी प्रा. मा. बिजली दडपे मॅडम यांचा परिचय करून देताना मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम.




६. हिंदी भाषेच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शन करताना कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी माजी प्राध्यापिका मा.बिजली दडपे मॅडम.




७. हिंदी दिवस कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम.




८.सायली चिकणे यशस्वीपणे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना.




९.. हिंदी दिवस कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना छात्राध्यापिका शिवानी डोईफोडे.